ठाणे, तालुका जालना

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** तालुका जालना

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0094 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/02/2024 16:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 09/02/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/02/2024
   **Time From (वेळेपासून):** 10:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 10:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/02/2024 **Time (वेळ):** 10:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/02/2024 16:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्लट नंबर 17माऊली नगर, अंबड रोड जालना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गोविंद रामभाऊ सरोदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कारला ताजिजालना,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कारला ताजिजालना,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीनिवास आनंदराव घुगे | | | 1. राप्लट नंबर 17,माऊली नगर, अंबड रोड जालना,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 09.02.2024.
फिर्याद
मी गोविंद रामभाऊ सरोदे वय 46 वर्ष व्यवसाय- शेती रा.कारला ता.जि.जालना मो.क्र.9860688205.

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 08.02.2024 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती की, मी मौजे कारला ता.जि. जालना येथे माझे कुटुंबासह राहतो. माझ्या नावावर मौजे कारला शिवारात शेत गट नंबर 14 मध्ये 17 आर जमिन आहे. घरकुल मंजुर होण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय कारला येथे ग्रामसभे मध्ये माझ्या नावाचा ठराव घेण्यात आला होता. माझा घरकुलाचा प्रस्ताव हा मंजुरीसाठी सादर करण्यासाठी गावामध्ये माझ्या नावावर घर बांधकामासाठी जागा नसल्याने मला घरकुलाचा लाभ घेण्यास अडचण येत होती.

त्यासाठी मी दिनांक 06.02.2024 रोजी आमच्या गावचे ग्रामविकास अधिकारी घुगे साहेबांना पंचायत समिती कार्यालय जालना येथे जाऊन भेटलो. त्यावेळी ते मला म्हणाले की, तुमचा घरकुलाचा प्रस्ताव मंजुरी करीता सादर करण्यासाठी तुमच्या नावावर गावामध्ये जागा नाही. त्यासाठी तुमच्या नावावरील मौजे कारला शिवारातील शेत गट नंबर 14 मधील 600 चौरस फुट जागा गाव नमुना 8- अ ला फेरफारची नोंद करुन घ्यावी लागेल त्याशिवाय तुम्हाला घरकुल मंजुर होणार नाही असे सांगीतले. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी घुगे साहेबांनी गाव नमुना 8-अ ची फेर नोंद घेण्यासाठी 5000 रुपये व माझ्या घरकुलाच्या फाईलचे काम करुन देण्यासाठी 5000 असे एकुण 10,000 रुपयांची मागणी करुन लगेच माझ्या कडून पंचायत समिती जालना येथे 1500 रुपये घेतले व मला दिनांक 08.02.2024 रोजी कागदपत्रे घेवून पंचायत समिती कार्यालय जालना येथे येण्यास सांगीतले.

मला ग्रामविकास अधिकारी घुगे यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना पैसे दिली नाही तर ते माझे काम करणार नाही. ग्रामविकास अधिकारी घुगे यांनी मागीतलेले पैसे हे लाचेचे आहे हे मला माहिती आहे म्हणून मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 08.02.2024 रोजी पंचायत समिती कार्यालय जालना येथे जावून ग्रामविकास अधिकारी घुगे यांची भेट घेणार आहे व माझ्या कामाविषयी त्यांचे सोबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची लेखी तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवर मी, पंचानी व श्री.बिडवे साहेब यांनी सह्या केल्या.

मी पंचायत समिती जालना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय कारला येथील ग्रामविकास अधिकारी घुगे यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दिनांक 08.02.2024 रोजी लाचेची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात श्री.बिडवे साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टच्या आतुन गळयात व्हाईस रेकॉर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 गुसिंगे यांचे सोबत ग्रामविकास अधिकारी घुगे यांना भेटण्यासाठी पंचायत समिती जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही ग्रामविकास अधिकारी घुगे यांना भेटण्यासाठी पंचायत समिती जालना कार्यालयात जाऊन ग्रामविकास अधिकारी घुगे यांचा शोध घेतला. परंतु पंचायत समिती कार्यालयात मिटींग सुरु असुन ती दुपारी संपणार असल्याचे आम्हास समजल्याने मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही ॲन्टी करप्शन

ब्युरो जालना येथे परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला.

त्यानंतर दिनांक 08.02.2024 रोजी दुपारी सव्वा तीन वाजता श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन ते एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळ्यात व्हाईस रेकॉर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 गुसिंगे यांचे सोबत ग्रामविकास अधिकारी घुगे यांना भेटण्यासाठी जुने पंचायत समिती जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही ग्रामविकास अधिकारी घुगे यांना भेटण्यासाठी जुने पंचायत समिती जालना येथे जाण्यासाठी माझ्या मोटार सायकलने रवाना होऊन जुने पंचायत समिती जालना कार्यालयात जावुन गाडी पार्किंग मध्ये उभी करुन पायी चालत जावुन जुने पंचायत समिती जालना कार्यालयाच्या आवारात ग्रामविकास अधिकारी घुगे यांची भेट घेतली. त्यावेळी माझी व ग्रामविकास अधिकारी घुगे यांचेत आपसात कामासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी घुगे यांनी पंच क्र.1 गुसिंगे यांचे समक्ष त्यांच्याकडून आता मी उद्या तीन काम करणार हे त्याचं पाच पाच हजार डायरेक्ट घेणार तुमच्या सारखं, तुम्ही मला काय करा आ, घरी गेले की कागदावर लांबी रुदी टाका असे म्हणाले असता मी त्याचे किती दयावे लागेल असे म्हणालो असता घुगे यांनी त्याचे पाच च ना असे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने मी घुगे यांना म्हणालो की, याला किती दयावं त्यावर घुगे साडे तीन राहीले ना ते असे म्हणाले. त्यानंतर थोडया वेळाने मी घुगे यांना म्हणालो की, मग किती देऊ सगळे मग दोन्ही मिळून त्यावर घुगे दोन्ही मिळून आता किती अं तीन अन चार सात दया साडे सात हजार असे म्हणाले. त्यानंतर थोडया वेळाने मी घुगे यांना म्हणालो की, तुम्ही लोकांचे घेता महे ते पण ते आपलं थोडं गरीबीचा काम हे त्यावर घुगे बर जाऊ दया चला तुमच्या मनासारखं, अडीच कमी होईल असे म्हणाले असता मी पाच हजार होऊ दयाना असे म्हणालो असता त्यावर घुगे हाव ना मग असे म्हणाले. त्यावरुन मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.बिडवे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये ग्रामविकास अधिकारी घुगे यांनी पंचा समक्ष मौजे कारला शिवारातील शेत गट नंबर 14 मधील 600 चौरस फुट जागा गाव नमुना 8- अ ला फेरफारची नोंद घेण्यासाठी व माझ्या घरकुलाच्या फाईलचे काम करुन देण्यासाठी यापुर्वी 1500/-रुपये स्विकारल्याचे मान्य करुन बाकी राहिलेले 7,500/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती 5000/-रुपये लाच दिनांक 09.02.2024 रोजी स्विकारण्यास संमती दिली असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 09.02.2024 रोजी ग्रामविकास अधिकारी घुगे यांचे विरुध्द माऊली नगर, अंबड रोड जालना येथील राहत्या घरी सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात पोलीस उपअधीक्षक यांच्या कक्षात पोलीस अंमलदार जावेद शेख यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. ग्रामविकास अधिकारी घुगे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 10 नोटा एकुण 5,000/- रुपये रक्कमेला अँथ्रासीन पावडर लावली. सदरील अँथ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. श्री.बिडवे साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन ग्रामसेवक घुगे यांनी लाच स्विकारल्या नंतर घुगे यांच्या घराच्या बाहेर येऊन उजव्या हाताची शर्टाची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार जावेद शेख यांना सापळा पथकातुन वगळुन ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात थांबण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापूर्व पंचनामा केला.

त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळ्यात व्हाईस रेकॉर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 गुसिंगे यांचे सोबत ग्रामविकास अधिकारी घुगे यांना भेटण्यासाठी माऊली नगर, अंबड रोड जालना येथील राहत्या घरी पाठविले. मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही आप आपल्या मोटार सायकलने माऊली नगर, अंबड रोड जालना येथे घुगे यांच्या राहत्या घरासमोर गेलो. माझ्या पाठीमागे श्री.बिडवे साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 पाटील यांचे सह खाजगी वाहनाने माऊली नगर, अंबड रोड जालना येथील घुगे यांच्या राहत्या घराजवळ आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात सापळा लावून थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही ग्रामविकास अधिकारी घुगे यांना भेटण्यासाठी घुगे यांच्या घरात गेलो.

त्याठिकाणी आमचे कामा संबधी बरीच चर्चा झाली. तेंव्हा चर्चे दरम्यान घुगे यांनी मला दोन वेळेस माझ्या जवळील बॉण्डवर झेरॉक्स दुकानातुन मचकुर टंकलिखीत करुन आणायचा सांगितल्याने मी व पंच क्र.1 गुसिंगे असे आम्ही बॉण्डवर मचकुर टंकलिखीत करुन घेतला. त्यानंतर आम्ही परत घुगे यांच्या घरी गेलो. त्यानंतर पुन्हा आमच्यात कामा संबधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर आमचे बोलणे चालु असतांना पंच क्र.1 गुसिंगे यांचे समक्ष ग्रामविकास अधिकारी घुगे यांनी आणले नाही का असे विचारले असता मी त्यांना आणले ना असे म्हणालो. त्यावर ग्रामविकास अधिकारी घुगे हे दया असे म्हणाल्याने मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन अॅन्थ्रासिन पावडर लावलेले लाचेचे 5000/- रुपये काढुन ग्रामविकास अधिकारी घुगे हयांचे समोर धरले असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवले. त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे सकाळी पावणे अकरा वाजेच्या सुमारास होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 पाटील यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार चेके यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांनी पंच क्र.1 गुसिंगे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 गुसिंगे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करुन यांनी तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने ग्रामविकास अधिकारी घुगे यांना पंचा समक्ष लाचेच्या रकमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर घुगे यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीनिवास आनंदराव घुगे वय 52 वर्षे व्यवसाय नोकरी ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कारला, पंचायत समिती जालना रा.प्लॉट नंबर 17, माऊली नगर, अंबड रोड जालना असे सांगीतले. त्यानंतर श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन पंच क्र.2 पाटील यांनी घुगे यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या खिश

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Janardhan Bhaulal Shewale
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): 1234
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अधिकारी
पो. स्टे ता जालना जि जालना

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Janardhan Bhaulal S
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1234